Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 03 April 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०३ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज थायलंडची राजधानी बँकॉक इथं पोहोचले. ही परिषद उद्या होणार आहे. आज संध्याकाळी पंतप्रधान मोदी, थायलंडचे पंतप्रधान शिनावात्रा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या प्रसंगी अनेक करारही होणार आहेत. या परिषदेनंतर पंतप्रधान उद्या श्रीलंकेला तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत.

****

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५ हजार ६०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची निर्मिती केली असून ५ हजार १५० किलोमीटरचं उद्दिष्ट पूर्ण केलं आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती देणयात आली.

****

आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत भारतीय रेल्वेनं एक हजार ६८१ रेल्वे इंजिनांची निर्मिती केली आणि याबाबतीत अमेरिका आणि युरोपला मागे टाकल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं एका पत्रकात दिली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही संख्या १९ टक्क्यांनी वाढलेली आहे.

****

वेव्हज २०२५ साठी भारताने चिली या देशाला आमंत्रित केलं आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी काल नवी दिल्लीत चिलीच्या संस्कृती, कला आणि वारसा मंत्री कॅरोलीना अर्रेडोंडो यांची भेट घेतली आणि त्यांना वेव्हज परिषदेचं आमंत्रण दिलं.

****

पेरणीपूर्वी राज्यातल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. पत असेल तर केंद्र सरकारकडून विशेष पॅकेज आणावं, असं आव्हानही त्यांनी दिलं. सत्तेत आल्यानंतर कर्जमाफीच्या आश्वासनाचा महायुतीच्या नेत्यांना विसर पडल्याचं आरोप त्यांनी केला.

****

राज्याच्या उच्च शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्यासाठी, महाराष्ट्र शासन आणि बोर्ड ऑफ ॲप्रेंटीसशिप ट्रेनिंग, आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्यात काल सामंजस्य करार करण्यात आला. राज्यातल्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्यवृद्धी, प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव आणि रोजगारक्षमतेच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा ठरेल, असं उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितलं. प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना दर महिन्याला किमान आठ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार असून, त्यातली ५० टक्के रक्कम केंद्र सरकारकडून थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

****

केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीनं राबवण्यात येत असलेल्या ॲग्रीस्टॅक या प्रकल्पाच्या अंतर्गत शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासाठी राज्यातल्या एक कोटी ४० लाख शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत अंदाजे ८५ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांची पूर्ण माहिती, त्यांची शेतजमीन, पीक पद्धती, आर्थिक विवरण, यांसह शेतकऱ्यांना आवश्यक असणारी माहिती जमा करण्यात येत आहे.

****

जालना जिल्ह्यात बदनापूर तालुक्यातल्या आन्वी इथं पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत श्री भगवानबाबा आश्रम शाळेच्या वसतिगृहाचं भूमिपूजन, राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते झालं. पालकमंत्री पंकजा मुंडे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यावेळी उपस्थित होते. हमखास रोजगार मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी बौद्धीक, शारिरीक क्षमता वाढवून कौशल्य प्राप्त करावं, असा सल्ला बागडे यांनी यावेळी दिला.

****

नाशिक जिल्ह्यात वणी इथल्या श्री सप्तशृंग निवासिनी देवीचा चैत्रोत्सव पाच ते १२ एप्रिलदरम्यान होत आहे. चैत्रोत्सवात श्री भगवती मंदिर दर्शनासाठी २४ तास खुलं राहणार असून, दररोज ७० ते ८० हजार भाविक हजेरी लावणार असल्याचा अंदाज

व्यक्त करण्यात आला आहे. मंदीर ट्रस्टने भक्तांच्या सुरक्षिततेसाठी अपघाती विमा उतरवला आहे.

****

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम या योजनेचं रत्नागिरी जिल्ह्याचं उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण झाल्याची माहिती, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अजिंक्य आजगेकर यांनी दिली. प्राप्त अर्जांपैकी दोन हजार २१० नवउद्योजकांचे अर्ज पात्र ठरले असून, ८१७ उद्योजकांना वित्तपुरवठा करण्यात आला आहे. लाभार्थ्यांना अनुदान मिळवून देण्यातही जिल्हा राज्यात अग्रेसर असल्याचं आजगेकर यांनी सांगितलं.

****

जालना जिल्ह्यात अंबड तालुक्यातल्या भणंगजळगावचे ग्रामविकास अधिकारी जयसिंग राठोड याला पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आलं. वारसाहक्काचं प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****

राज्यातल्या अनेक भागात काल अवकाळी पाऊस झाला.

रत्नागिरीत आज पहाटे अनेक ठिकाणी वीजांसह सुमारे तासभराहून अधिक काळ जोरदार पाऊस पडला. या पावसामुळे उकाड्यातून दिलासा मिळाला असला, तरी आंबा-काजूसारख्या पिकांसाठी तो नुकसानकारक ठरणार आहे. धुळे जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. नेर गावासह परिसरात गारपीटीमुळे पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या अनेक गावात गारपीट, वादळी वाऱ्यासह पावसानं जोरदार हजेरी लावली. वादळी वारे आणि पावसामुळं काढणीस आलेल्या आणि शेतात काढून ठेवलेल्या कांद्यासह अन्य पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं.

भंडारा जिल्ह्यात आज सकाळपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस होत आहे.

****